शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. शअजा/प्र-१३९०३
दिनांक:- २९/०१/२०२६
ईमेल–cityengineer@punecorporation.org
दूरध्वनी क्र.:–०२०२५५०१३१३

अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,पुणे महानगरपालिका

श्री.जयदीप कुलकर्णी
१०२, अथर्व अपार्टमेंट
९६१ –A सदाशिव पेठ
पुणे–४११०३०
मो–९९२२९४७७४३

अपिलार्थी

विरुद्ध

नवलकुमार काळे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक
शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रतिवादी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल

श्री.जयदीप कुलकर्णी यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज शहर अभियंता कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने आवक क्र. PUMCO/R/2025/62546 दि. १४/११/२०२५ रोजी दाखल केला. माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही या कारणाने प्रथम अपिल अर्ज पुणे महानगरपालिका शहर अभियंता कार्यालयास आवक क्र. ई ऑफिस क्र. ८४१३२ दि. २६/१२/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारा संबंधीची माहिती खालीलप्रमाणे –

माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक
१४/११/२०२५	१२/१२/२०२५	—	निरंक

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण – माहिती मॅन्युअली सत्यप्रतीत उपलब्ध करून मिळवी

प्रथम अपिल अर्जाचा तपशील				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक
१२/०१/२०२६	२३/१२/२०२५	होय	निरंक	२०/०१/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ: – दि.२७/०१/२०२६ वेळ:– दुपारी ३.३० वाजता

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील

क्र.	अर्जदाराने मागितलेली माहिती	जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर / माहिती
	अ २००१ पासुन पुणे महानगरपालिकेने कोणत्या कोणत्या जागा शॉपिंग सेंटरसाठी आरक्षित करून त्या अक्वायर (Acquire) केल्या आहेत याची सविस्तर माहीती देण्यात यावी. ब. पुणे महानगरपालिकेने स्वतः २००१ पासुन किती शॉपिंग सेंटर बांधले आहेत याची सविस्तर माहीती आणि पत्ते (Address) देण्यात यावे. क. पुणे महानगरपालिकेला त्यांच्या मालकीच्या शॉपिंग सेंटरच्या माध्यमातून वार्षिक किती उत्पन्न मिळते याची सविस्तर माहिती देण्यात यावी.	निरंक

विवेचन

१. सदर बाब तांत्रिक स्वरुपाची असून विकास योजना व भवन रचना विभागाशी संबंधित आहे. त्यानुसार अर्ज वर्ग केले आहेत.तथापि माहिती प्राप्त झालेली नाही

निर्णय

सदरचे अपील स्वीकारण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी विकास योजना विभाग व भवन रचना विभाग पुणे मनपा यांचेकडे अपील अर्जाच्या अनुषंगाने आरक्षणाची माहिती व त्यावरील बांधकामा बाबत विचारणा करून अपिलार्थीस दि.१६/०२/२०२६ पर्यंत उपलब्ध माहिती रजिस्टर ए.डी.पोस्टाने देण्यात यावी.सदरचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.अपिलार्थीस अपील निर्णय रजिस्टर ए.डी पोस्टाने कळविण्यात यावा.

Baeval 22/2/26

(मुकुंद बर्वे)
कार्यकारी अभियंता तथा
प्रथम अपिल अधिकारी
शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका

सदर माहितीने आपले समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत ४ था मजला, पुणे –१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत –

१. श्री.जयदीप कुलकर्णी १०२, अथर्व अपार्टमेंट,९६१ –A सदाशिव पेठ, पुणे
२. मा. प्रथम अपील अधिकारी, शहर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका– माहितीस्तव
३. जनमाहिती अधिकारी, शहर अभियंता कार्यालय, (आस्थापना विभाग)पुणे महानगरपालिका